जा.क्र.वि.शा./निवडणुक कक्ष/१२१६६/२०२४
पोलीस उप आयुक्त, वि.शा. कार्यालय,पुणे
दिनांक :- १६/१०/२०२४

**विषय :- भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बी.एन.एस.एस) २०२३ चे कलम १६३ प्रमाणे आदेश.**

आदेश

ज्याअर्थी, निवडणूक आयोग, भारत सरकार यांचे मुख्य निवडणुक अधिकारी, भारत सरकार यांचे प्रेसनोट क्र.ECI/PN/149/2024 DATE 15.10.2024 अन्वये महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूका घेण्याचा कार्यक्रम जाहीर केलेला आहे. आचारसंहीता दिनांक १५/१०/२०२४ रोजी पासून निवडणूकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अस्तित्वात राहील. सदरच्या निवडणुका ह्या सुरळीतपणे व शांततेत पार पाडण्यासाठी पुणे पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत कायदा व सुव्यवस्था राखणे कामी सार्वजनिक मालमत्तेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने व उपद्रव टाळण्यासाठी सर्व प्रकारची शस्त्रे व हत्यारे यांना जवळ बाळगून फिरणेस मनाई करणे अत्यंत जरूरीचे आहे, अशी माझी खात्री झालेली आहे.

पुणे शहर पोलीस आयुक्तालय हद्दीमध्ये १९८ शिरुर, २०२ पुरंदर, २०३ भोर, २०८ वडगावशेरी, २०९ शिवाजीनगर, २१० कोथरुड, २११ खडकवासला, २१२ पर्वती, २१३ हडपसर, २१४ पुणे कॅन्टोंमेंन्ट व २१५ कसबा पेठ असे एकुण ११ विधानसभा मतदार संघात दिनांक २०/११/२०२४ रोजी मतदान होणार असून मतमोजणी ही दिनांक २३/११/२०२४ रोजी होणार आहे.

त्याअर्थी मी रंजन कुमार शर्मा, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर मला भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा आदेश देतो की, संपूर्ण पुणे शहरात **दिनांक १६/१०/२०२४ चे ००.०१ वा. पासून ते दिनांक २५/११/२०२४ रोजी २४.०० वा.पर्यंत** संपूर्ण मतदान प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत खालील प्रमाणे आदेश देत आहे.

नमूद मुदतीत अधिकृत हत्यार परवान्यावरील कोणत्याही प्रकारची हत्यारे घेवून फिरणेस या आदेशान्वये मनाई करण्यात येत आहे. सदरचा आदेश कायदेशीर कर्तव्य बजावित असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना (पोलीस दल, संरक्षण दल, तुरुंग विभाग, बँक सुरक्षा विभाग व इतर केंद्रीय तसेच राज्य शासनाचे अधिकारी व कर्मचारी यांना) लागू राहणार नाही. ज्या परवाना धारकास रुढी प्रमाणे बंदुक डिस्प्ले करण्याचा अधिकार आहे त्यांना हा आदेश लागू राहणार नाही.

सदर आदेशाचा उल्लंघन करणारी व्यक्ती भारतीय न्याय संहिता कलम २२३ अन्वये शिक्षेस पात्र राहिल.

सदरचा आदेश माझे सही शिक्यानिशी आज रोजी दि.१६/१०/२०२४ रोजी दिला आहे.

पोलीस सह आयुक्त पुणे शहर

16/10/2024

(रंजन कुमार शर्मा)
पोलीस सह आयुक्त,
पुणे शहर

ठिकाण :- पुणे शहर
दिनांक :- १६/१०/२०२४

जा.क्र.वि.शा./निवडणुक कक्ष/१२१६५ /२०२४
पोलीस उप आयुक्त, वि.शा. कार्यालय,पुणे
दिनांक :- १६/१०/२०२४

विषय :- **महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३६ प्रमाणे आदेश.**

आदेश

ज्याअर्थी, निवडणूक आयोग, भारत सरकार यांचे मुख्य निवडणुक अधिकारी, भारत सरकार यांचे प्रेसनोट क्र.ECI/PN/149/2024 DATE 15.10.2024 अन्वये महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूका घेण्याचा कार्यक्रम जाहीर केलेला आहे. आचारसंहीता दिनांक १५/१०/२०२४ रोजी पासून निवडणूकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अस्तित्वात राहील. पुणे शहर पोलीस आयुक्तालय हद्दीमध्ये १९८ शिरुर, २०२ पुरंदर, २०३ भोर, २०८ वडगावशेरी, २०९ शिवाजीनगर, २१० कोथरुड, २११ खडकवासला, २१२ पर्वती, २१३ हडपसर, २१४ पुणे कॅन्टोंमेन्ट व २१५ कसबा पेठ असे एकुण ११ विधानसभा मतदार संघात दिनांक २०/११/२०२४ रोजी मतदान होणार असून, मतमोजणी ही दिनांक २३/११/२०२४ रोजी होणार आहे.

त्याअर्थी, सदरच्या निवडणूका ह्या सुरळीतपणे व शांततेत पार पाडणे साठी पुणे पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणून मी **रंजन कुमार शर्मा, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर** मला महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३६ प्रमाणे प्राप्त झालेल्या अधिकारानुसार खालील प्रमाणे आदेश देत आहे.

१) कोणत्याही कारणासाठी सार्वजनिक सभा / सभेचे ठिकाण व वेळ याबाबत संबंधित पोलीस ठाण्याच्या पोलीस अधिकाऱ्यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

२) कोणत्याही प्रकारच्या मिरवणूका काढण्याबाबत संबंधित पोलीस ठाण्याच्या पोलीस अधिकाऱ्यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

३) ध्वनीक्षेपकाचा वापर कोणत्याही प्रकारे रात्रौ २२.०० ते सकाळी ०६.०० वा. पर्यंत करु नये.

४) फिरत्या वाहनावरुन ध्वनीक्षेपकाचा वापर करु नये. ध्वनीक्षेपकाचा वापर वाहन थांबवूनच करावा.

५) ध्वनीक्षेपकाचा परवाना जवळ बाळगावा.

६) ध्वनीक्षेपकाच्या आवाजाच्या तिव्रतेवर घालून दिलेल्या मर्यादेची काटेकोरपणे पालन करावे.

७) शाळा, कॉलेज, रुग्णालय या ठिकाणी थांबून ध्वनीक्षेपकाचा वापर करु नये.

८) निवडणूकीचे कालावधीत प्रचाराच्या अनुषंगाने एकावेळी कोणत्याही परिस्थितीत १० पेक्षा अधिक वाहने एका ताफ्यात चालवू नयेत. तसेच दोन ताफ्यातील अंतर हे २०० मीटर/ १५ मिनिटांचे असावे.

९) सदरचा आदेश संरक्षण वाहनांच्या ताफ्यासह, केंद्र किंवा राज्य शासनाचे मंत्री किंवा उच्च पदस्थ व्यक्ती घेवून जात असेल तेव्हा त्यांच्या सुरक्षिततेविषयी लागू असलेल्या आदेशास अधिन राहून अंमलात राहील तसेच सदरचा आदेश शासकिय कामावर असलेल्या वाहनाच्या संदर्भात लागू राहणार नाही.

१०) रस्त्यावरून जाणाऱ्या जमावाचे अगर मिरवणुकीत व्यक्तीचे वागणे अगर कृत्याबाबत पोलीस स्टेशन स्वाधीन अधिकाऱ्याने आदेश देणे.

११) ज्या मार्गाने मिरवणूक किंवा जमाव जाईल अगर जाणार नाही ती वेळ व मार्ग पोलीस स्टेशन स्वाधीन अधिकाऱ्याने निश्चित करणे.

१२) सार्वजनिक ठिकाणी अगर सार्वजनिक करमणुकीच्या कार्यक्रमाच्या वेळी वापरण्यात येणाऱ्या लाऊड स्पिकरच्या ध्वनीची तिव्रता निश्चित करून दिलेली वेळ यावर पोलीस स्टेशन स्वाधीन अधिकाऱ्याने नियंत्रण करणे.

१४) मिरवणुकीचे प्रचाराच्या निमित्ताने जाहीर सभा घेण्याचे ठिकाण, दिनांक व वेळ याबाबत पोलीस स्टेशन स्वाधीन अधिकाऱ्याने नियंत्रण करणे.

हा आदेश संपूर्ण पुणे पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत दिनांक १६/१०/२०२४ चे ००.०१ वा. पासून ते दिनांक २५/११/२०२४ चे २४.०० वा. पर्यंत लागू राहील. सदरचा आदेश भंग करणारी व्यक्ती महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम १३४ नुसार शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश माझे सही शिक्क्यानिशी आज दिनांक१६/१०/२०२४ रोजी दिला आहे.

ठिकाण :- पुणे शहर
दिनांक :-१६/१०/२०२४

(रंजन कुमार शर्मा)
पोलीस सह आयुक्त,
पुणे शहर